No. of Printed Pages : 4 **एफ.एम.टी.-01**

**BDP / BCA / BTS**

# मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम

00345

## सत्रांत परीक्षा

## दिसम्बर, 2014

## पाठ्यक्रम कोड : एफ.एम.टी.-01

*समय : 2 घण्टे* *अधिकतम अंक : 50*

***नोट :*** *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

---

**1.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : *10*

(a) धरणांचे महत्त्व

(b) माझा आवडता कवी

(c) वृक्षांचे रक्षण आणि संवर्धन

(d) जीवनात मूल्यांचे महत्त्व

**2.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा : *8*

(a) तुकारामांनी साधूंची कोणती लक्षणे सांगितली आहेत ?

(b) केशवसुतांनी कविप्रतिभेचे कार्य कोणते सांगितले आहे ?

(c) मर्ढेकरांच्या काव्यशैलीचे वेगळेपण स्पष्ट करा.

(d) आक्कावर माहेरी कौतुकाचा वर्षाव कसा झाला ?

**3.** खालीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे लिहा : *6*

(a) म्हातारीने तांब्याची अंगठी मुद्दाम तात्याला हातात घालायला का लावली ?

(b) चेलम्यावरील प्रसंगातून कोणत्या सामाजिक परिस्थितीचे दर्शन होते ?

(c) आकाशाशी नाते जोडल्यावर शिरवाडकरांना कोणता अनुभव आला ?

(d) मुग्लीमायच्या अखेरच्या उद्गारात कोणती भावना होती ?

**4.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर टीपा लिहा : *6*

(a) डॉक्टरी दुष्ट-चक्रातील डॉ. त्रिवेदींची भूमिका.

(b) ऐतिहासिक सत्य आणि साहित्यातील सत्य.

(c) भाषांतर हे शास्त्र आणि कलाही आहे.

(d) प्रभावी बातमी लेखन.

**5.** नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि क्रियाविशेषण यांचे प्रत्येकी एक-एक उदाहरण देऊन, त्यांचा वाक्यात उपयोग करा. *5*

**किंवा**

खालीलपैकी ***एका*** कल्पनेचा सुमारे सहा ते आठ ओळींत विस्तार करा :

(a) जुने ते सोने.

(b) उद्योगाचे घरी ऋद्धी सिद्धी पाणी भरी.

(c) जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती.

**6.** खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** वाक्प्रचारांचा अर्थ सांगा : *3*

(a) खडे चारणे

(b) कर्णाचा अवतार

(c) मोगलाई

(d) कोंड्याचा मांडा करणे

(e) हात आभाळाला पोचणें

**किंवा**

खालीलपैकी कोणत्याही ***तीन*** म्हणींचा अर्थ स्पष्ट करा :

(a) चोराच्या मनात चांदणं.

(b) हा सूर्य, हा जयद्रथ.

(c) राजाला रोजच दिवाळी.

(d) गर्जेल तो पडेल काय, बोलेल तो करील काय ?

(e) मान सांगावा जना आणि अपमान सांगावा मना.

**7.** खालीलपैकी कोणत्याही ***एका*** प्रश्नाचे उत्तर थोडक्यात लिहा : *4*

(a) लोकशाहीच्या यशस्वितेसाठी कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता डॉ. आंबेडकरांनी सांगितली आहे ?

(b) भांडवलशाही समाजव्यवस्था आणि समाजवादी समाजव्यवस्था यांतील फरक कोणता ?

(c) लोकसंख्यावाढीचे दुष्परिणाम कोणते ?

(d) रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर मानवजातीस धोकादायक कसा ?

8. खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : *4*

Man, believes Darwin, is a social animal. He is not a fallen angel, but a risen savage. His path is not downward, but upward. Yet, on the other hand, he is not a creature set apart from all other living creatures. On the contrary, he is intimately related to everything that moves and breathes and struggles to live.

9. खालील उताऱ्याचा सारांश लिहा : *4*

या शरीरासकट सामाजिक जीवन जगणं बाईसाठी संस्कृतीच्या कुठल्याच टप्प्यावर बहुधा फारसं सुखद नसावं; कारण बहुतेक वेळा त्या शरीराची ताबेदारी कुणा दुसऱ्याकडंच असल्याचा इतिहास आहे. इतिहासाला ठाऊक आहेत आवडल्या म्हणून उचलून नेलेल्या कित्येक विवाहिता आणि अविवाहिताही, इतिहास आहे दानाची रक्कम पुरेशी नसल्यावर पोटच्या मुलीला उर्वरित रकमेच्या बदल्यात दान दिल्याचा, बापाला, भावाला, नवऱ्याला पैसे हवेत म्हणून त्यांनी गहाण ठेवलेल्या बायकांच्या नोंदी इतिहासाच्या धुळीत पडलेल्या पानांवर अजून आहेत. तडफडणाऱ्या मनाचे कढ आवरत नको असलेल्या पुरुषाच्या स्वाधीन शरीर करणाऱ्या तर हजारो, लाखो बायका पहात आला आहे इतिहास. केवळ बुरख्यांमधील स्त्रियाच नव्हेत तर जगभरात कितीतरी बायका आजही अदृश्य बुरख्यांमध्येच वावरत आहेत आणि जन्माला येतानाच आज प्रत्येक स्त्रीजीव असुरक्षिततेचा शापघेऊन येतो आहे. सुसंस्कृत म्हणवणाऱ्या मानवसमूहाला ही किती लाजिरवाणी गोष्ट आहे !

---